**दिवाणी मुकदमा क्र. १९/२०१२ मधील निशाणी ३२ वरील आदेश**
**(दिनांक १०.०८.२०१६)**

०१. प्रतिवादींनी प्रस्तुतचा अर्ज भारतीय साक्षी पुरावा कायदा कलम ६५ अन्वये दुय्यम पुरावा देण्याची परवानगी मिळणेबाबत दाखल केला आहे.

०२. प्रतिवादींनी असे कथन केले आहे की, वादीने या न्यायालयात रे.मु.न. ८९/२०११ हा दावा याच वाद मिळकतीबाबत याच प्रतिवादी विरुध्द निरंतरचे ताकीदीसाठी दाखल केला होता. त्या दाव्यामध्ये वादीने वाद मिळकती बाबत ती स्वतंत्र त्याचे ताब्यात आहे हे दर्शविणेसाठी पुरावा म्हणून महत्वाची कागदपत्रे दाखल केली होती. त्या कगदपत्रांच्या सही शिक्याच्या नकला प्रतिवादींनी नि. क्र. ३१ चे यादी सोबत हजर केलेल्या आहेत. मुळ कागद प्रतिवादींचे ताब्यात नाहीत. सदरच्या नकला वादीचे उलट तपासात वादीस दाखवणे आवश्यक आहे. तथापी, त्यासाठी प्रतिवादींस दुय्यम पुरावा देणेची परवानगी मिळणे आवश्यक आहे. म्हणून प्रतिवादींना नि.क्र. ३१ चे यादी सोबत दाखल केलेल्या कागदपत्राच्या नक्कला बाबत दुय्यम पुरावा देणेस परवागी मागितली आहे.

०३. या उलट वादी यांनी प्रस्तूतच्या अर्जास त्याचे म्हणणे नि. क्र ३४ वर दाखल केले आहे. वादीच्या कथना नुसार प्रतिवादींनी दिलेला अर्ज कायदेशीर नसून अर्जातील मजकूर वादी यास मान्य व कबूल नसून सदरची मजकूर खोटा व लबाडीचा आहे. कायदयातील तरतुदी नुसार पुरावा कामी अस्सल प्रती असले शिवाय पुराव्यात वाचता येणार नसून सदर प्रतिवादी यांनी दाखल केलेल्या प्रती यांच्या अस्सल प्रती उपलब्ध असून सदरील प्रतिवादी यांनी दाखल केलेल्या प्रती सदरील दाव्यात पुरावा म्हणून वाचता येणार नसून प्रतिवादी यांनी अर्जा नुसार मागिलेली परवानगी कायदयाने देता येणार नाही या कारणाने प्रतिवादी दिलेला अर्ज नामंजूर करणेत यावा अशी विनंती केली आहे.

०४. अर्जातील कथने पाहता खालील मुद्दे उपस्थित होतात व त्या प्रत्येक मुदयास आणि निष्कर्षास अनुसरुन उत्तर मी निम्न प्रकारे देत आहे.

| मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|
| ०१ प्रतिवादींनी नि. क्र. ३१ अन्वये दाखल केलेल्या कागदपत्रा बाबत दुय्यम पुरावा देण्यासाठी योग्य कारण दर्शविले आहे का ? | *..होकारार्थी* |
| ०२ कोणता आदेश ? | *..अंतिम आदेशाप्रमाणे.* |

## का र ण मि मां सा

**मुद्दे क्रमांक १ व २ः—**

०५. वादी व प्रतिवादींच्या विद्वान वकिलांचा युक्तिवाद ऐकला. दाखल असलेले सर्व कागदपत्रांचे अवलोकन केले.

०६. प्रतिवादीच्या म्हणण्या प्रमाणे वादीने या न्यायालयात रे.मु.न. ८९/२०११ हा दावा याच मिळकतीत बाबत याच प्रतिवादी विरुध्द निरंतरचे ताकीदीसाठी दाखल केला होता. त्या दाव्यामध्ये वादीने वाद मिळकती बाबत ती स्वतंत्रपणे त्याचे ताब्यात आहे हे दर्शविण्यासाठी पुरावा म्हणून महत्वाची कागदपत्रे दाखल केली होती त्या कागदपत्रांच्या सही शिक्याच्या नकला या प्रतिवादीनीं या कामी हजर केल्या आहे. मुळ कागद हे प्रतिवादीचे ताब्यात नाहीत.

०७. प्रतिवादींच्या कथना नुसार त्यांना आवश्यक असलेली कागदपत्रे ही न्यायालयात दुस—या दाव्या मध्ये वादीने हजर केलेली आहे. सदरचा दावा अदयाप प्रलंबित आहे. प्रतिवादींना सदरची कागदपत्रे ही वादीच्या ताब्यात नसल्याचे माहित

असल्यामुळे त्यांनी वादींना भारतीय साक्षी पुरावा कायदा कलम ६६ नुसार कागदपत्रे दाखल करण्यासाठी नोटीस दिलेली नाही. प्रतिवादींनी स्वत: त्या कागदपत्रांच्या प्रमाणित प्रती अभिलेखावर हजर केल्या आहेत. तसेच मूळ कागदपत्रे न दाखल करण्याचे योग्य कारण भारतीय साक्षी पुरावा कायदा कलम ६५ नुसार दिलेले आहे. त्यामुळे सदरच्या कागदपत्रा बाबत दुय्यम पुरावा देण्यासाठी परवानगी देणे न्यायोचित आहे. सबब मुद्या क्रमांक १ चे उत्तर होकारार्थी देवून व मुद्या क्र. २ च्या उत्तरा दाखल खालील आदेश पारित करीत आहे.

**आ दे श**

०१. अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

०२. प्रतिवादींनी दुय्यम पुरावा म्हणून दिलेली नि.क्र. ३१ च्या प्रमाणीत प्रत दुय्यम पुरावा म्हणून स्विकारण्यात येते. .

**(रोहिणी रा. संकपाळ)**
दिनांक : १०.०८.२०१६ सह दिवाणी न्यायाधीश,क. स्तर, सांगोला

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this PDF file Judgment/Order is same word to word as per the original Judgment / Order

| | | | |
|---|---|---|---|
| (a) | Name of the Stenographer | : | Kotkunde A.R. |
| (b) | Court | : | Smt. R.R. Sankpal<br>Jt. Civil Judge, J.D.&<br>J.M.F.C.Sangola |
| (c) | Judgement /Order signed by P.O. on | : | 10.08.2016 |
| (d) | Judgement /Order uploaded on | : | 10.08.2016 |